**नि.फौ.ख.क्र.४५/२०१९**
**शासन वि. इजाज अहमद**
**नि.क्र.४२**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३</u>**

नावः अब्दूल रशीद अब्दूल रहीम पटेल,
वयः ७४ वर्ष, धंदाः सेवानिवृत्त,
पत्ताः कामठी, तह. कामठी, जि. नागपूर

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र.३ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः</u>**

१. घटना दिनांक २२/०१/२०१४ रोजी डोरली, पारशिवनी येथील आहे. मला अंदाजे ११:०० वाजातच्या दरम्यान घटनेबाबत माहीती मिळाली. घटना शेत गट नंबर ९६, मौजा डोरली मधील आहे. त्या रोजी मला सलीम याने सांगितले की, आपल्या शेतातील झाडांची कापणी सुरु आहे. त्या नंतर मी माझा भाउ मोहम्मद नईम, व त्याचे मित्र युसुफ खान, मोहम्मद शरीफ, माझा मुलगा मोहम्मद ईरफान, मोहम्मद रफीक यांना सलीम सोबत घटनेबाबत माहीती घेणेकरीता डोरली येथे पाठवीले. त्या नंतर मी गावातील लोकांकडून माहीती घेतली, तेव्हा मला समजले की नदीच्या काठी झाडांची कटाई सुरु आहे. त्या नंतर मी माझा भाउ नसीम पटेल याच्यासोबत घटनास्थळावर पाहोचलो. त्या ठिकाणी सलीम, नईम, मोहम्मद शरीफ, युसुफ खान, रफीक, इरफान पटेल तसेच ईजाज व तारीक तसेच ठेकेदार बाबू कश्यप हे हजर होते.

२. मी तेथील मजूरांना विचारले की, तुम्ही झाडे का कापत आहात, हे खेत आमचे आहे. त्यावर मजूरांनी सांगितले की, तुम्ही ठेकेदार बाबू कश्यप यांना विचारा. त्या नंतर मी बाबू कश्यप यास विचारणी केला असता, त्याने सांगितले की, ईजाज व तारीक यांनी त्याला झाडे कापण्यास ठेका दिला. त्या नंतर मोहम्मद सलील अब्दूल

करीम पटेल याने मला सांगितले की, मी त्यांना झाडे कापण्यास मनाई केली. परंतू, ते माझे काही ऐकत नाहीत. माझ्या मुलाने मजुरांचे झाड कापतांनाचे फोटो काढले. त्या नंतर आम्ही तेथून निघून आलो. त्या नंतर पारशिवनी येथे पोलीस ठाण्यात आलो. त्या नंतर मोहम्मद नईम अब्दूल रहिम पटेल याने घटनेची तक्रार दिली. रिपोर्ट दिल्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्या नंतर मी दिनांक ०२/०२/२०१४ रोजी पोलीस स्टेशन, तहसीलदार, वन विभाग, एस.पी., डी.वाय.एस.पी यांच्याकडे घटनेची तक्रार दिली.

३. त्या नंतर तहसीलदार यांनी शेताची पाहणी मंडळ अधिकारी मार्फत करुन घेतली. तहसीलदार यांनी ६१ झाडांची कापणी झाल्याचा अहवाल मला व पोलीस स्टेशनला दिला. नईम याच्या नावाने दिलेल्या रिपोर्ट वर कार्यवाही न झाल्याने सलीम याच्या नावे रिपोर्ट दिला. त्या नंतर पोलीसांनी कार्यवाही केली. ज्यांनी झाड कापले तेच कापलेले झाड घेवून गेले. कापलेल्या झाडांमध्ये बोराचे झाड, कडूलिंबाचे झाड, तीन सागवनचे झाड, पळसाचे झाड, चीचबीलाईचे झाड, आंब्याचे एक झाड अशी झाडे होती. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

४. पोलीस निरीक्षक, पारशिवनी, यांना दिलेल्या तक्रारीचा स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४३** देण्यात आला. तहसीलदार, पारशिवनी यांना पोलीस स्टेशनला दिलेल्या पत्राची प्रत अभिलेखावर दाखल केली. त्यास **नि.क्र.४४** देण्यात आला. त्या नंतर तहसीलदार, पारशिवनी यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे दिलेल्या स्मरणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केली. त्यास **नि.क्र.४५** देण्यात आला. घटनास्थळाचे १२ फोटो अभिलेखावर दाखल आहेत. त्यास **आर्टिकल A ते L** देण्यात आला. नवनील फोटो स्टूडिओचे बील अभिलेखावर दाखल आहेत. त्यास **आर्टिकल M** देण्यात आला. पोलीस अधिक्षक यांना दिलेल्या पत्राची स्थळप्रत

अभिलेखावर दाखल केली. त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात आला. सलीम यांना आरोपी तक्रार करण्यापूर्वी धमकी देत होते. त्या बाबत सलीम याने पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्याची स्थळप्रत अभिलेखावर दाखल आहे. रजिस्टर्ड पोस्टाच्या ०५ पावत्या अभिलेखावर दाखल केल्या आहेत. त्यास **नि.क्र.४७ ते ५१** देण्यात आला. एकूण ०५ पोच पावत्या अभिलेखावर दाखल केल्या आहेत. त्यास **नि.क्र.५२ ते ५६** देण्यात आला. पोलीस स्टेशन तर्फे प्राप्त झालेले सूचनापत्र अभिलेखावर दाखल केले. त्यास **नि.क्र.५७** देण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी क्र.१ व २ तर्फे श्री पी.एस.सायरे वकील साहेब यांच्यामर्फत उलटतपास शपथेवर सुरुः–**

५. आरोपी व आमच्यामध्ये कायदेशी कार्यवाही सण २०१४ पासून सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नंबर ९६ या मालमत्तेत आरोपींचा हक्क व अधिकारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नंबर ९६ या मालमत्तेच्या वाटणीबाबत या न्यायालयात प्रकरण सुरु होते. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात सुरु असलेल्या प्रकरणामध्ये मी व आरोपी पक्ष आहोत. हे म्हणणे खरे आहे की, कामठी न्यायालयात माझ्याविरुध्द कलम ४२० अंतर्गत प्रकरण सुरु आहे. सदर प्रकरणात कमर जहाँ यांनी तक्रार दिली आहे. कमर जहाँ ही सलीम पटेल याची मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अभिलेखावर दाखल केलेले दस्त सदर प्रकरणत पोलीसांनी बयान नोंदवितेवेळेस माझ्या ताब्यात होते. नसरीम परवीन ही तारीक अंसारीची पत्नी आहे. तारीक अंसारी हा आरोपी क्र.२ आहे. हे म्हणणे खरे आहे की, नसरीम परवीन हीने माझ्याविरुध्द कलम ४२० च्या अंतर्गत प्रकरणामध्ये साक्ष दिली होती.

६. मी अभिलेखावर दाखल केलेले दस्त पोलीसांना दिले नव्हते, त्याच्या झेरॉक्स प्रती दिल्या होत्या. मी पोलीसांना बयान देते वेळेस असे सांगितले होते की, **'मी तेथील मजूरांना विचारले की, तुम्ही झाडे का कापत आहात, हे खेत आमचे आहे. त्यावर मजूरांनी सांगितले की, तुम्ही ठेकेदार बाबू कश्यप यांना विचारा. त्या नंतर मी बाबू कश्यप यास विचारणी केला असता, त्याने सांगितले की, ईजाज व तारीक यांनी त्याला झाडे कापण्यास ठेका दिला. त्या नंतर मोहम्मद सलील अब्दूल करीम पटेल याने मला सांगितले की, मी त्यांना झाडे कापण्यास मनाई केली. परंतू, ते माझे काही ऐकत नाहीत. माझ्या मुलाने मजुरांचे झाड कापतांनाचे फोटो काढले. त्या नंतर आम्ही तेथून निघून आलो. त्या नंतर पारशिवनी येथे पोलीस ठाण्यात आलो. त्या नंतर मोहम्मद नईम अब्दूल रहिम पटेल याने घटनेची तक्रार दिली. रिपोर्ट दिल्यानंतर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्या नंतर मी दिनांक ०२/०२/२०१४ रोजी पोलीस स्टेशन, तहसीलदार, वन विभाग, एस.पी., डी.वाय.एस.पी यांच्याकडे घटनेची तक्रार दिली. त्या नंतर तहसीलदार यांनी शेताची पाहणी मंडळ अधिकारी मार्फत करुन घेतली. तहसीलदार यांनी ६१ झाडांची कापणी झाल्याचा अहवाल मला व पोलीस स्टेशनला दिला. नईम याच्या नावाने दिलेल्या रिपोर्ट वर कार्यवाही न झाल्याने सलीम याच्या नावे रिपोर्ट दिला. त्या नंतर पोलीसांनी कार्यवाही केली. ज्यांनी झाड कापले तेच कापलेले झाड घेवून गेले. कापलेल्या झाडांमध्ये बोराचे झाड, कडूलिंबाचे झाड, तीन सागवनचे झाड, पळसाचे झाड, चीचबीलाईचे झाड, आंब्याचे एक झाड अशी झाडे होती.'** परंतु सदर मजकूर माझ्या बयानात नमूना नाही, तो का नमूद नाही याचे कारण सांगू शकत नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा सदर घटनेशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, परवीन तारीक व कमर जहॉ यांच्या वडिलांचा शेत गट क्र.९६ मध्ये हक्क व अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत

आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणतेही प्रकारची झाडे कापली नाही व कोणत्याही प्रकारचा गुन्हा केला नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.04.08 13:25:47 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.04.08 13:25:55 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः ०८/०४/२०२५